सत्यमेव जयते

ISSN : 2320-1460

# NATIONAL JOURNAL OF EXTENSIVE EDUCATION AND INTERDISCIPLINARY RESEARCH

Volume V Issue III
October 2017



Government College of Education,
Institute for Advanced Studies in
Education, Aurangabad (M.S.)

INTERNATIONAL ACCREDITATION ORGANIZATION
IAO

| Sr. No. | Title of the Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 14. | शिक्षक शिक्षणातील समस्या | *कातखडे नितिन विक्रम*<br>*साळवे सुभाष नथ्थु*<br>*हुंडेकर प्रदिप अशोकस्वामी* | 53 |
| 15. | क्षमंताधिष्ठित अध्यापक शिक्षण | प्रा.डॉ. के. एल. चिंचोलीकर<br>प्रा.डॉ. आर एल. जाधव | 56 |
| 16. | स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षक शिक्षण : सिंहावलोकन आणि आगामी काळातील आव्हाने | यशश्री बालासाहेब जगतकर | 62 |
| 17. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षक-शिक्षण शिक्षणाक्रमांच्या संदर्भात एक दृष्टीक्षेप | श्री.सोनुने एस.एस.<br>डॉ.डी.डी. पवार | 69 |
| 18. | वर्ष 2000 ते 2015 च्या कालखंडातील शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमा संदर्भातील स्थिती आणि आव्हाने. | प्रा.डॉ.चोंडेकर नलिनी<br>प्रा.वनवे किरणकुमार दगडू | 73 |
| 19. | स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षक शिक्षण - सिहांवलोकन आणि आगामी काळातील आव्हाने स्वातंत्र्य प्राप्ती ते NCTE स्थापने पर्यतचा कालखंड (1948 ते 1961) | राऊत सतिश रमेशपंत<br>डॉ. सुभेदार.बी. पी. | 79 |
| 20. | स्वातंत्र्य प्राप्ती हे स्थापने पर्यंतचा कालखंड (१९४७ ते १९६१) शिक्षक - शिक्षण आढावा. | किरण रूपचंद मोतीचुर<br>प्रा.डॉ.नलिनी चौंडेकर | 83 |



*It is made clear from editor, publisher & printer that the research articles & research papers published " National Journal of Extensive Education and Interdisciplinary Research" belongs exclusively to it writer alone, The editor, Publisher & printer of this journal will not be responsible if writer violate copyright act. The writer himself will be responsible for further consequences and legal actions.*

ISSN 2320-1460

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षक-शिक्षण शिक्षणाक्रमांच्या संदर्भात एक दृष्टीक्षेप

**श्री.सोनुने एस.एस.**
सहाय्यक प्राध्यापक
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ.डी.डी. पवार**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## सारांश

कोणत्याही समाजाची, राष्ट्राची प्रगती ही शिक्षकामुळे होत असते, म्हणून राष्ट्राच्या दर्जा इतकेच महत्व शिक्षकांच्या दर्जालाही आहे. यासाठी सरकार व समाजाने अशी परिस्थिती निर्माण करावी, जी शिक्षकांच्या रचनात्मकता आणि सर्जनशिलतेला प्रेरित करण्यामध्ये सहाय्यक ठरेल, असे मत १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षक शिक्षणाच्या विषयी व्यक्त केले आहे. भारत हा गरिबांचा श्रीमंत असा देश आहे. या देशात अनेक समाजाचे लोक विभिन्न परिस्थितीत एकत्र राहतात. अशा समाजातील परिस्थितीने पिडलेल्या आणि गरिबीने झिंगलेल्या समाजापर्यंन्त ज्ञानाची गंगा नेवून त्यांच्यात चैतन्य, उत्साहासह नवी आशा निर्माण करून दिशा देण्याचे कार्य मुक्त व दूरस्थ शिक्षणाच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ करित आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ करीत आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या माध्यमातून KG TO PG पर्यन्त चे शिक्षणक्रम राबविले जातात. त्यात बालसंगोपन व रंजन शिक्षणक्रम, SHG शिक्षणक्रम, शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम, मूल्य शिक्षणप्रमाणपत्र शिक्षणक्रम, एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम, प्रमाणपत्र शिक्षणक्रम, आशय युक्त अध्यापन पद्धती, विशेष गरजा असलेल्या शाळांच्या शिक्षणसाठी विशेष बी.एड. शिक्षणक्रम व बी.एड. शिक्षणक्रम घरकामगार सहाय्यक पदविका शिक्षणक्रम, एम.एड. शिक्षणक्रम, एम.फिल शिक्षणक्रम, पीएच.डी. शिक्षणक्रम तूर्त बंद आदी शिक्षणक्रम राबविले जातात. हे सर्व शिक्षणक्रम अध्यापकांच्या व्यावसायिक उन्नतीसाठीच विकसित करण्यात आले आहे. हे शिक्षणक्रम अध्यापकांच्या व्यावसायिक उन्नतीसाठीच विकसित करण्यात आले आहे. हे शिक्षणक्रम राबवितांना विविध आव्हानांना देखिल सामोरे जावे जागत आहे. त्यात प्रामुख्याने शिखर संस्थाकडून बंद करण्यात आलेले शिक्षणक्रम चालू करण्याचे, प्रवेशासंदर्भातील आव्हान, बहूविध भाषेतून अध्यायन साहित्या बाबतचे आव्हान आदी काही आव्हाने समोर असले तरी मुक्त शिक्षक-शिक्षण शिक्षणक्रमाच्या माध्यमातुन त्यावर मात करून गुणवत्ता विकासासाठी कार्य चालू आहे व पुढे देखिल चालू राहिल.

**प्रस्ताविक :**

कोणत्याही समाजाची, राष्ट्राची प्रगती ही शिक्षकामुळे होत असते, म्हणून राष्ट्राच्या दर्जा इतकेच महत्व शिक्षकांच्या दर्जालाही आहे. यासाठी सरकार व समाजाने अशी परिस्थिती निर्माण करावी, जी शिक्षकांच्या रचनात्मकता आणि सर्जनशिलतेला प्रेरित करण्यामध्ये सहाय्यक ठरेल, असे मत १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षक शिक्षणाच्या विषयी व्यक्त केले आहे.

त्याच प्रमाणे १९९२ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने शिक्षण शिक्षणाविषयी शिक्षकांची व्यावसायिक क्षमता विकसित करण्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण, उदबोधन वर्ग, जनसंपर्क साधने, उन्हाळी वर्ग याद्वारा प्रयत्न करावेत, असे नमुद केले आहे.

भारत हा गरिबांचा श्रीमंत असा देश आहे. या देशात अनेक समाजाचे लोक विभिन्न परिस्थितीत एकत्र राहतात. अशा समाजातील परिस्थितीने पिडलेल्या आणि गरिबीने झिंगलेल्या समाजापर्यंन्त ज्ञानाची गंगा नेवून त्यांच्यात चैतन्य, उत्साहासह नवी आशा निर्माण करून दिशा देण्याचे कार्य मुक्त व दूरस्थ शिक्षणाच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ करित आहे.

व्यवसाय, संसार, नोकरी, रोजंदारी अशी अनेक कामे करत करत समाजातील अनेक घटक आपली ज्ञानाची तृष्णा मुक्त विद्यापीठीय शिक्षणाच्या माध्यमातून पूर्ण करून प्रगती साधत आहे. मुक्त विद्यापीठीय शिक्षण म्हणजे प्रगतीचे लक्षण ही म्हणून रूढ व सार्थ करित आहे. आज अनेक क्षेत्रात मुक्तविद्यापीठातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी मोठ्या पदावर कार्य करून मुक्त विद्यापीठाच्या मार्फत समाजातील शिक्षणापासुन वंचित असलेल्या व शिक्षणघेण्याची आस किंवा ध्यास असलेल्या घटकासाठी अनेक शिक्षणक्रम विविध विद्याशाखांच्या मार्फत राबविले जातात.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या माध्यमातून KG TO PG पर्यंन्त चे शिक्षणक्रम राबविले जातात. त्यात बालसंगोपन व रंजन शिक्षणक्रम SHG शिक्षणक्रम, शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम, मूल्य शिक्षणप्रमाणपत्र शिक्षणक्रम, एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम, शालेय व्यवहाराकरिता माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान शिक्षणक्रम, आशय युक्त अध्यापन पद्धती, विशेष गरजा असलेल्या शाळांच्या शिक्षणसाठी विशेष बी.एड. शिक्षणक्रम व बी.एड. शिक्षणक्रम घरकामगार सहाय्यक पदविका शिक्षणक्रम एम.एड. श्किक्षणक्रम एम.फिल. शिक्षणक्रम, पीएच.डी.शिक्षणक्रम तूर्त बंद आदी शिक्षणक्रम राबविले जातात. हे सर्व शिक्षणक्रम अध्यापकांच्या व्यावसायिक उन्नतीसाठीच विकसित करण्यात आले आहे.

मुक्त विद्यापीठामार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध शिक्षणक्रमाला प्रवेश घेणारे अध्ययनार्थी हे साधारणतःदोन प्रकारचे असतात १. बहिस्त प्रेरणा असलेले २. शिकण्याची अंर्त प्रेरणा असलेले. ज्याची शिक्षणाची प्रेरणा बहिस्थ असते, अशा प्रकारच्या अध्ययनार्थीसाठी अध्ययनसाहित्याच्या माध्यमातून शिकण्याची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य मुक्त विद्यापीठाच्या अध्ययन साहित्यानुसार होते. सामाजिक गरजा व बदल लक्षात घेऊन मुक्त विद्यापीठाने बऱ्याच शिक्षणक्रमाची निर्मीती केली. त्याच प्रमाणे महाराष्ट्रातील शिक्षण-शिक्षणाची गरज लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील बी.एड.शिक्षणक्रम, एम.एड.शिक्षणक्रम, शालेय व्यवस्थापन पदविका विक्षणक्रम, एम.ए.शिक्षणक्रम सुरू झाले, या शिक्षणक्रमांची उद्दिष्टे सांगता येतात.

१. अर्धशिक्षित व अप्रशिक्षित शिक्षकांच्या पात्रता वाढविणे.
२. शिक्षक शिकवित असलेल्या अध्यापन विषयातील आशयाचे ज्ञान व अध्यापनशास्त्राचे ज्ञान अभिवृध्दींगत करणे.
३. शिक्षकाची नवी भूमिका बजावण्यासाठी मदत करणे.
४. नव्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांची आवश्यक ती तयारी करणे.
५. नवीन शालेय अभ्यासक्रमाशी संबंधीत प्रश्नांचीं उकल करण्यासाठी सिध्द करणे.
६. महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेला निश्चित दिशा देणे.
७. शिक्षकांमध्ये संशोधनात्मक दृष्ट्रिकोन विकसित करणे.
८. शालेय व्यस्थापन व विद्यार्थी विकासाठी सक्षम नेतृत्व विकसित करणे.
९. अध्यापकांची ज्ञानपातळी उच्चावण्यासाठी मदत करणे, शैक्षणिक संशोधनासाठी आवश्यक ते ज्ञान व कौशल्ये विकसित करणे.
१०. बालवाडी व अंगणवाडी यांच्यासाठी तंज्ञ शिक्षक निर्माण करणे.
११. अध्यापकामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर अध्यापनात करण्यासाठी कौशल्ये विकसित करणे.
१२. पात्रता धारक अध्यापकांना शालेय विषयातअध्यापन पद्धतीची संधी उपलब्ध करून देणे.
१३. अध्यापकांना त्यांच्या आवडीच्या शालेय विषयातील आशयाची समृध्दी व एकात्मिकरण करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

अनेक शैक्षणिक व प्रशासकिय बदल व आव्हाने स्विकारत महाराष्ट्रातील शिक्षण श्रेत्राला एक नवी दिशा देण्याचे कार्य ह्या शिक्षणक्रमाच्या माध्यमातून झाले व आजतागायत विविध अभ्यासकेंद्राच्या माध्यमातून चालत आहे.

एन.सी.ई.आर.टी.ने पूरविलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व विद्यापीठाला लाभलेले आता पर्यंन्तचे सर्व सन्मांतीय कुलगुरू तसेच शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालक पदी आलेल्या व्यक्तींनी व महाराष्ट्रतील शिंक्षणतज्ज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे या शिक्षणक्रमांना वेगवेगळे आयाम प्राप्त झालेले आहेत.

१. अध्ययनार्थीला अध्ययन साहित्य पूरविणारा

शिक्षणक्रम
२. व्यावसायिक विकासासाठी पूरक असा शिक्षणक्रम
३. संप्रेक्षण व माहिती तंत्रविज्ञानाचे उपयोजन करणारा शिक्षणक्रम
४. शिक्षणांना विमर्षशील चिंतन शिकविणारा शिक्षणक्रम
५. लवचिक अध्यापन शैलीचा स्विकार करणारा शिक्षणक्रम
६. शाळाधिष्ठि शिक्षणक्रम

**आव्हाने :**

**१.संशोधनात्मक शिक्षणक्रम सुरू करण्याचे आव्हान :**

UGC व NCET या शिखर संस्थांनी मुक्त व दुरस्थ शिक्षणामार्फत चालविले जाणारे पीएच.डी., एम.फिल., व एम. एड. आदी शिक्षणक्रम राबविण्यासाठी तुर्त तरी मान्यता दिली नाही. त्यामुळे आपले व्यवसाय सांभाळून उच्च संशोधनात्मक शिक्षण घेण्याची ईच्छा असणाऱ्या समाजातील अध्ययनार्थीना व शिक्षकांना ते उपलब्ध नाहीत. त्यामुळे ते शिक्षणक्रम सुरू करण्यासाठी UGC व NCET संस्थांना सदरील शिक्षणक्रम मुक्त व दुरस्थ शिक्षणामार्फत राबविण्याचे महत्व पटवुन देणे हे एक आव्हानच सर्व मुक्त व दुरस्थ शिक्षणदेणाऱ्या संस्थासाठी आहे.

**२. विद्यापीठाच्या संशोधन शिक्षक-शिक्षणक्रमाकडे इतर संस्थाचा पाहण्याचा दृष्टीकोन :**

मुक्त व दुरस्थ शिक्षणाच्या माध्यमातुन उच्च शिक्षण पुर्ण करणाऱ्या अध्ययनार्थीकडे बऱ्याच संस्था गुणात्मक दृष्टया निकृष्ठ दर्जाच्या दृष्टीकोनातुन पाहतात. त्यामुळे बऱ्याच वेळा अध्ययनार्थीना त्याचा त्रास होतो. त्यामुळे बऱ्याचदा विद्यापीठ कडे पदव्याच्या समकक्षता बाबत विचारणा केली जाते.. समाजमध्ये मुक्त व दुरस्थ शिक्षणाच्या बाबत अद्यापही फारसी जागृती झालेली दिसून येत नाही.

**३. प्रवेशासंदर्भातील आव्हान :**

बालसंगोपन व रंजन शिक्षणक्रम प्रमाणपत्र, शालेय व्यवहाराकरिता माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान, स्वंय सहाय्यता बचत गट शिक्षणक्रम, मूल्यशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम उत्तीर्ण झालेल्या अध्ययनार्थीचा शासकिय सेवेत प्राधान्य क्रमाने विचार अद्यापही होत नसल्याने ह्या शिक्षणक्रमांच्या प्रवेश बाबतची आव्हाने आहे. शासनाने बालवाडी, अंगणवाडी पर्यवेक्षिका तसेच महिला व बालविकास क्षेत्रात बालसंगोपन व रंजन शिक्षणक्रम प्रमाणपत्राचा विचार केल्यास त्याच्या प्रवेशाबाबत लक्षणीय वाढ होऊन, ह्या क्षेत्रात कार्य करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्ती मिळतील. तसेच मुल्य शिक्षण हा शिक्षणक्रम, शालेय व्यवहाराकरिता माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान शिक्षणक्रम सेवातर्गंत प्रशिक्षणााठी अनिवार्य केल्यास, त्यांचाही समाजाला व पर्यायाने शिक्षण क्षेत्रला लाभ होईल. शिवाय सदरील शिक्षणक्रमाच्या प्रवेशाबाबतचे आव्हान ही संपुष्ठात येईल.

**४. ऑन-लाईन प्रवेश प्रक्रिया :**

विद्यापीठाने ऑनलाईन प्रवेश पध्दतीचा स्विकार केला आह. विद्यापीठच्या सर्वच शिक्षणक्रमाचे प्रवेश हे ऑन-लाईन पध्दतीने चालू शैक्षणिक वर्षी झाले आहे. प्रवेशासाठी अर्ज करतांना अध्यनार्थीनी माहिती पुस्तिका व प्रवेशाबाबतच्या सुचना काळजीपुर्वक न वाचल्याने त्यात त्रुटी आहेत.

**५. बहूविध भाषेतून अध्ययन साहित्या बाबतचे आव्हान :** शिक्षक शिक्षणासाठीच्या शिक्षणक्रमाला समाजातील विविध भाषा बोलणारे, तसेच इंग्रजी भाषेचा अंगीकार करून पुरस्कार करणाऱ्या विविध व्यक्ती प्रवेश घेतात. मुक्त विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षक-शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतल्यानंतर अध्ययनार्थीना अध्ययन करण्यासाठी अध्ययन साहित्य देण्यात येते, सदरील अध्ययन साहित्याचे माध्यम मराठी आहे. बऱ्याचदा शिक्षकांकडून इंग्रजी, हिंदी, उर्दू भाषेतील अध्ययन साहित्याची मागणी केली जाते.

**६. माहिती अधिकार पत्राद्वारे मागितली जाणारी मागणी किंवा कोर्ट केस :**

शिंक्षक-शिक्षणक्रमसाठी प्रवेश घेणारे अध्ययनार्थी हे ज्ञान वृध्दीसाठी प्रवेश घेत असले तरी बहुदा उच्च शिक्षण घेतल्यानंतर मिळाणारी पदोन्नती व वेतन वाढ ह्यामुळे ज्या प्रवेशच्छुक व्यक्तीला सदरील शिक्षणक्रमासाठी प्रवेश मिळत नाही. अशी व्यक्ती एखाद्या प्रवेश झालेल्या पण प्रवेश समितीची दिशाभुल करून प्रवेश मिळविला आहे. असा संशय असलेल्या उमेद्वाराच्या बाबत माहिती अधिकारात अनेकदा विविध नावाने माहिती मागविते किंवा प्रवेश समितीने प्रवेश नाकारल्याबाबतच्या स्पष्टीकरणाने सामाधान न झाल्यास प्रवेश बाबत कोर्ट केस दाखल करते. त्यामुळे माहिती अधिकारात मागितली जाणारी माहिती व कोर्ट केस हे देखील आव्हान ठरत आहे.

ISSN 2320-1460

**७. अध्ययनार्थीच्या राजकिय अंगाचा कंगोरा :**

शिक्षक-शिक्षणक्रमाला प्रवेश घेणारे काही सेवातंर्गत शिक्षण हे विशिष्ट राजकिय पक्षाशी संबंधित असतात. त्यामुळे ते त्यांबाबीचा फायदा प्रवेश प्रक्रिया किंवा अभ्यासकेंद्रवर गेल्यानंतर संपर्क सत्राबाबत घेण्याच प्रयत्न करतात. प्रवेश प्रक्रिया ही नियमा प्रमाणे होत असल्याने त्यात अशा अध्ययनार्थीच्या राजकिय अंगाच्या देखाव्याचा काहीही परिणाम होत नाही. परंतू नियमाप्रमाणे प्रवेश झाल्यास अभ्यासकेंद्रावील व्यक्तिंना त्या त्रास देतात.

**८. अभ्यासकेंद्रावरील असहकार्य :**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिक्षक-शिक्षणाशी संबंधित शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्र परिस्थिती ही अलिकडील काळात मोठ्या प्रमाणावर बदलत आहे. अनेक ठिकाणी नियमित शिक्षणक्रमाला प्रवेशासाठी अध्यनार्थी न मिळाल्याने अध्यापक महाविद्यालय व अध्यापक विद्यालय बंद पडण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे तेथील कर्मचारी वर्ग संस्थाचालक कमी करीत आहे. त्यामुळे कमी कर्मचारी वर्गाकडून शिक्षणक्रम राबवितांना अनेक अडचणी अभ्यासकेंद्राला येत आहे. शिवाय त्यामुळे अध्ययनार्थीना देखील त्याचा त्रास होत आहे.

शिवाय मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणक्रमाचे संपर्क सत्र हे सुट्टीच्या दिवशी किंवा सुट्यामध्ये येत असल्याने अभ्यासकेंद्रावरील समंत्रक व प्रशासकिय व्यक्ती अभ्यासकेंद्राचे कार्य सुट्टीच्या दिवशी करण्यासाठी नाही म्हणत नसल्यातरी तरी विविध कारण समोर करून ते टाळतात. असे अभ्यासकेंद्र आढावा बैठकितून लक्षात येते. त्यामुळे केंद्रप्रमुख व केंद्रसमन्वयक यांना अभ्यासकेंद्र चालवितांना अडचणी जाणवत आहे. तरी देखील गेस्ट व्याख्याते बोलावून ते संपर्क सत्र आयोजित करीत करतात.

**९. पूर्ण वेळ पध्दतीने डी.एड. केलेल्या सेवांतर्गत शिक्षकांचाच प्रवेशासाठी विचार :**

बी.एड. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी २८ नोंव्हे. २०१४ राजपत्रानुसार पूर्ण वेळ पदध्दतीने डी.एड.किंवा डी.टी.एड. अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या सेंवातर्गत शिक्षकांनाच प्रवेश दिला जातो. त्यामुळे जे शिक्षक अप्रशिक्षित म्हणून सेवेत रूजू झाले व त्यांनी सेवातंर्गत डी.एड.किंवा डी.टी.एड.पूर्ण अशा शिक्षकांना प्रवेशासाठी झगडावे लागत आहे. शिवाय माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर कार्य करणाऱ्या अप्रशिक्षित शिक्षकांना बी.एड.सेवातंर्गत शिक्षणक्रमाला आता प्रवेश मिळत नाही. त्यामुळे त्यांना नोकरी पासुन मुकावे लागत आहे. किंवा नियमित बी.एड. शिक्षणक्रमाला प्रवेश घेऊन शिक्षक शिक्षण घ्यावे लागत आहे. त्यामुळे अशा शिक्षकांच्या प्रवेशाबाबत एक आव्हान निर्माण होत आहे.

१०. इती विद्यापीठांचा मुक्त विद्यापीठाच्या शिक्षक-शिक्षण शिक्षणक्रमाकडे पाहण्याचा दृष्टीकोन.

११. विद्यापीठ व अभ्यासकेंद्र यांच्या तील योग्य वेळी न होणारा संपर्क.

१२. तंत्रज्ञान वापरण्यास अध्ययनार्थी व अभ्यासकेंद्राना तयार करण्याचे आव्हान.

**समारोप :**

उच्च शिक्षणाच्या प्रचार व प्रसार करणाच्या कार्यात नियमित विद्यापीठाच्या बरोबरीने. मुक्त विद्यापीठाचे कार्य केले आहे. विविध प्रशासकीय सेवेत मुक्त विद्यापीठाचे अध्ययनार्थीनी स्थान मिळविले असल्याने मुक्त व दुरस्थ शिक्षणाची गुणवत्ता ही त्यातुन समाजासमारे आपोआपच दिसुन आली आहे.महाराष्ट्रातील सोवातंर्गत शिक्षक-शिक्षणाला दिशा व गती देण्याचे कार्य मुक्त विद्यापीठाच्या मार्फत झाले आहे. त्यामुळे मुक्त विद्यापीठाच्या शिक्षक-शिक्षण शिक्षणक्रमाचे वेगळे असे महत्व आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**


१. जोशी अनंत संपादक २००३ दूरशिक्षणद्वारे शिक्षक-प्रशिक्षण, नाशिक, यचममुवि
२. चिंचोलीकर कृतिका, जाधव रवि २०१० अध्यापक शिक्षण, पुणे, नित्यनुतन प्रकाशन
३. जोशी अनंत संपादक १९९९ आशययुक्त अध्यापन पद्धती, नाशिक, यचममुवि
४. सांगोलकर अरूण २०११ नवीन जागतीक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह, नाशिक, इनसाईड पब्लिकेशन
५. भारत का राजपत्र डिसे २०१४ राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, न्यु दिल्ली
६. बी.एड. शिक्षणक्रम माहिती पुस्तिका २०१६, यचममुवि, नाशिक